## ग्रामीण भागाच्या समस्यांचे स्वरुप जाणून ग्रामीण भागाच्या समस्या पत्रकारांनी मांडाव्यात

## - कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र, यांचे प्रतिपादन

## वर्ध्याच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात ग्रामीण प्रसारमाध्यम कार्यशाळेचे उद्‌घाटन

**नागपूर/ वर्धा : १६ जून २०१७**

ग्रामीण भाग हा मुख्य प्रसारमाध्यमाच्या केंद्रस्थानी सद्यस्थितीत राहत नसून ग्रामीण समस्यांचे स्वरुप समजून पत्रकारांनी विकास संवादाच्या माध्यमातून त्या मांडाव्यात , असे आवाहन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र यांनी आज वर्धा येथे केले. केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयांतर्गत कार्यरत नागपूर येथील पत्र सूचना कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय- वर्धा आणि जनसंपर्क विभाग, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, यांच्या सहकार्याने गालिब सभागृह, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ परिसर, वर्धा येथे आयोजित ग्रामीण प्रसारमाध्यम कार्यशाळा – 'वार्तालाप'चे उद्‌घाटन आज त्यांचे हस्ते झाले , त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या उद्‌घाटन सत्राला 'तरुण भारत'चे निवृत्त मुख्य संपादक , श्री. सुधीर पाठक,वर्धा जिल्हा माहिती अधिकारी श्रीमती मनीषा सावळे , पत्र सूचना कार्यालय, नागपूरचे उप-संचालक श्री. संजय आर्वीकर हे प्रामुख्याने उपस्थित होते.






ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने व ग्रामीण श्रोता, वाचक यांचे स्वरुप, स्वभाव लक्षात घेऊन पत्रकारांनी आपली लेखनशैली, संवादशैली यात परिवर्तन करणे व आपला संवाद ग्रामीणांना सहज समजणा-या भाषेत पोहचवणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातल्या बातम्या शहरी भागात व शहरी भागाच्या बातम्या ग्रामीण भागात पोहचून स्वास्थ, शिक्षा , नागरिकीकरणाचे संवाद यासंदर्भात सामान्य जनतेस माहिती मिळते, असे याप्रसंगी प्रो. गिरीश्वर मिश्र यांनी सांगितले.

'तरुण भारत'चे निवृत्त मुख्य संपादक श्री. सुधीर पाठक, यांनी आपल्या बीज-भाषणात गेल्या 70 वर्षांच्या कालावधीमध्ये घडलेल्या ऐतिहासिक घडामोडींचा धावता आढावा व समकालीन पत्रकारितातील






त्याचे प्रतिबिंब मांडले. 'आकाशवाणी 'माध्यमाचा कल्पक वापर पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आधुनिक





काळात केला याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. जनतेच्या आशा आणि आकांक्षा सरकारपर्यंत पोहचवणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

## पत्रकारांनी ज्ञानाची व्याप्ती वाढवावी- जयदीप हर्डीकर

जागतिक स्तरावर परिणाम करणा-या घटनेचे विश्लेषण आपण त्यामागे असण-या वैश्विक संदर्भ समाजावून घेऊन व व त्यासंदर्भातील ज्ञानाची व्याप्ती वाढवून , केल्यास त्या वृत्ताचा वाचक वर्ग वाढेल.







तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मुद्रित माध्यमांनी संकेतस्थळाच्याद्वारे पत्रकारांनी वाचक वर्ग व्यापक करावा, असे मत ग्रामीण पत्रकारांची भूमिका : स्थानिक वृत्त - राष्ट्रीय दृष्टिकोन' या विषयावर जेष्ठ मुक्त पत्रकार श्री जयदीप हर्डीकर, यांनी ''विकास संवाद ' या विषयासंदर्भात मांडले.

## आपत्तीच्या वेळी वृत्तांकन करतांना तारतम्य ठेवणे आवश्यक: श्री. मंगेश इंदापवार ,

'आपत्ती व्यवस्थापनात वृत्तपत्रे आणि समाज माध्यमांची भूमिका' यासंदर्भात मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र टाईम्स, नागपूरचे विशेष प्रतिनिधी यांनी आपत्तीचे प्रकार, माध्यमांची भूमिका ,आपत्ती काळातील







संवाद याबाबत विद्यमान परिस्थितीतील उदाहरण देऊन विवेचन केले. पत्रकारांसाठी ब्लॉग हे अभिव्यक्तीचे एक माध्यम असून ज्या विषयासंदर्भात आपल्याला लिहायचे त्या विषयाची सखोल माहिती असणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

यानंतर झालेल्या प्रश्नोत्तराच्या सत्रात तज्ज्ञांनी पत्रकारांच्या प्रश्नांचे निराकरण केले.

## माहिती प्रस्फोटाच्या युगात उपलब्ध माहितीचा वापर विवेकाने करावा- श्री. सुनील डबीर

आकाशवाणी नागपूरचे, उप संचालक (वृत्त) श्री. सुनील डबीर यांनी ‘ग्रामीण क्षेत्रात प्रभावी संवादामध्ये मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका‘ या विषयावर बोलतांना मुद्रित व







इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे स्वतंत्र अस्तित्व आहे,असे मत व्यक्त केले . माहिती प्रस्फोटाच्या युगामध्ये पत्रकारांनी उपलब्ध माहितीचा विवेकबुद्धीने करावा, असेही त्यांनी याप्रसंगी सुचविले.

## यशकथांसाठी बातम्याचे रचनात्मक पैलू समजून घ्यावेत- श्री नितीन केळकर,

बातमीचे सकारात्मक व नकारात्मक संदर्भ व त्याचे रचनात्मक पैलू पत्रकारांनी यशकथाच्या निर्मितीसाठी समजून घेणे आवश्यक आहे. यशकथा हा व्यक्ती महात्म्य वाढविणा-या नसाव्यात त्या



लोकोपयोगी असणा-या हव्यात, असे मत आकाशवाणी, पुणेचे उप-संचालक(वृत्त), श्री नितीन केळकर यांनी 'कृषी संकटाच्या वेळी यशकथांची समर्पकता' या विषयावर व्याख्यान देतांना व्यक्त केले.

## जी.एस.टी. मुळे करचुकवेगिरला आळा बसेल : सनदी लेखापाल (सी.ए.), श्री .व्ही.बी. देशपांडे

'वस्तू आणि सेवा कर-कायदा : सकारात्मक पैलू' यावर वर्धा येथील सनदी लेखापाल (सी.ए.), श्री .व्ही.बी. देशपांडे यांनी विवेचन करतांना वस्तू आणि सेवा कर यासंदर्भातील विस्तारपुर्वक माहिती उपस्थितांना दिली. वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे एकच करप्रणालीखाली देश येईल, याचा लाभ सामान्य जनतेपर्यंत पोहचेल, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या सत्रानंतरही प्रश्नोत्तराचे सत्र झाले. कार्यशाळेच्या समारोपीय सत्रात आभार प्रदर्शन महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी श्री. बुद्धदास मिरगे यांनी केले. कार्यशाळेत वर्धा, समुद्रपूर , हिंग़णघाट येथील पत्रकार, पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे अधिकारी उपस्थित होते.

***